आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

e Paper

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in शुक्रवार दिनांक 24/04/2026 METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 108 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# राज्यभर एक लाखांहून अधिक नोकऱ्यांची संधी!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई : राज्यात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक आकर्षित करून रोजगारनिर्मितीला चालना देण्यासाठी तब्बल ₹2,56,137.01 कोटींच्या 18 विशाल व अतिविशाल प्रकल्पांना विशेष प्रोत्साहन देण्यास मान्यता देण्यात आली आहे. यामुळे सुमारे 1 लाखांहून अधिक प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.**




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या मंत्रिमंडळ उपसमितीची 14 वी बैठक पार पडली. बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उद्योग व मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. पी. अन्बळगन, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलारासू तसेच विकास आयुक्त दिपेंद्रसिंह कुशवाह उपस्थित होते.

या बैठकीमध्ये थ्रस्ट सेक्टर तसेच उच्च तंत्रज्ञानावर आधारित सोलर सेल, मॉड्युल, इन्गॉट, वेफर्स, ग्रीन स्टील, हरित अमोनिया, इलेक्ट्रॉनिक्स उत्पादने, अवकाश व संरक्षण साहित्य, लिथियम-आयन बॅटरी, इलेक्ट्रिक वाहन निर्मिती/साहित्य, स्टील व गॅस-टू-केमिकल निर्मितीचे विशाल व अतिविशाल प्रकल्पांना विशेष प्रोत्साहने मंजूर करण्यासाठीच्या 18 प्रस्तावांना मुख्यमंत्री फडणवीस यांनी मान्यता दिली.

यामध्ये नाशिकमधील व्हर्च्युओसो कॉम्प्रेसर्स प्रा. लि. 800 कोटींची गुंतवणूक करून 500 जणांना रोजगार देणार आहे. अमरावती येथे टेंबो डिफेन्स प्रोडक्ट प्रा. लि. 1,000 कोटींची गुंतवणूक करत आहे. पुण्याच्या तळेगाव भागात युरोबस इंडिया प्रा. लि. 4,200 कोटींची गुंतवणूक करून 12,000 रोजगार निर्माण करेल. चंद्रपूरमध्ये मिलीयन स्टील प्रा. लि. 256.01 कोटींच्या गुंतवणुकीतून 360 रोजगार निर्माण होणार आहेत.

या प्रकल्पांमुळे कोकण, विदर्भ, मराठवाडा आणि राज्यातील इतर भागांत औद्योगिक विकासाला मोठी चालना मिळणार असून स्थानिक अर्थव्यवस्थेला बळकटी मिळेल. तसेच तांत्रिक नवकल्पना, संशोधन-विकास आणि मजबूत पुरवठा साखळी निर्माण होण्यास मदत होईल. सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांनाही याचा लाभ होणार आहे. याशिवाय, स्थानिक कामगारांसाठी प्रशिक्षण व कौशल्यविकासाच्या संधी उपलब्ध होऊन त्यांच्या रोजगारक्षमतेत वाढ होईल.

# काटेवाडीत सुनेत्रा पवारांसह पवार कुटुंबाचे मतदान

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**बारामती : माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघासाठी काल पोटनिवडणुकीचे मतदान शांततेत आणि उत्साहात सुरू आहे. बारामतीसह राहुरी मतदारसंघातही मतदानाची प्रक्रिया सुरू असून, सकाळपासूनच मतदारांनी मतदान केंद्रांकडे गर्दी केली आहे.**





या पोटनिवडणुकीत महायुतीकडून सुनेत्रा पवार या प्रमुख उमेदवार म्हणून रिंगणात असून, एकूण 23 उमेदवार निवडणूक लढवत आहेत. सकाळी 9 वाजेपर्यंत बारामतीत सुमारे 8.1 टक्के मतदानाची नोंद झाली असून, ग्रामीण भागातही मतदारांचा प्रतिसाद समाधानकारक असल्याचे चित्र आहे. प्रशासनाने मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडण्यासाठी आवश्यक ती सर्व यंत्रणा सज्ज ठेवली आहे.

दरम्यान, बारामती तालुक्यातील काटेवाडी येथे पवार कुटुंबीयांनी एकत्र येत मतदानाचा हक्क बजावला. सुनेत्रा पवार यांनी मतदान करून नागरिकांना लोकशाही बळकट करण्यासाठी मोठ्या संख्येने मतदान करण्याचे आवाहन केले. त्यांच्यासोबत पार्थ पवार यांनीही मतदान केले.

या वेळी खासदार सुप्रिया सुळे, त्यांची मुलगी रेवती सुळे तसेच कुटुंबातील इतर सदस्य उपस्थित होते. आमदार रोहित पवार यांनीही कुटुंबासह मतदान करत नागरिकांना मतदानासाठी प्रेरित केले. काटेवाडी परिसरात पवार कुटुंबाच्या मतदानामुळे राजकीय वातावरण अधिकच तापलेले दिसून आले.

मतदान केंद्रांवर सुरक्षेची कडक व्यवस्था ठेवण्यात आली असून, पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे. ज्येष्ठ नागरिक, महिला आणि दिव्यांग मतदारांसाठी विशेष सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. काही ठिकाणी ईव्हीएम यंत्रांमध्ये किरकोळ तांत्रिक अडचणी आल्याचे समोर आले असले, तरी त्या तात्काळ दूर करण्यात आल्या असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

दरम्यान, या पोटनिवडणुकीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले असून, निकालाबाबत प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. बारामती हा पारंपरिकदृष्ट्या प्रभावशाली राजकीय गड मानला जात असल्याने या निवडणुकीचा निकाल आगामी राजकीय समीकरणांवर परिणाम करणारा ठरण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मतदानाचा टक्का दिवसभरात लक्षणीय वाढेल, असा अंदाज व्यक्त केला जात असून, सायंकाळपर्यंत मतदारांचा उत्साह कायम राहण्याची शक्यता आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शुक्रवार दिनांक 24/04/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# स्थायी समितीत जलतरण तलावाचा मुद्दा तापला ; प्रशांत जगताप आक्रमक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे महानगरपालिकेच्या स्थायी समिती बैठकीत रास्ता पेठेतील छत्रपती शाहू महाराज जलतरण तलाव या विषयावर जोरदार चर्चा रंगली. तलावाच्या कंत्राट व्यवस्थापनावरून सत्ताधारी आणि प्रशासनामध्ये चांगलीच खडाजंगी झाली. सभागृह नेते गणेश बिडकर यांनी हा मुद्दा उपस्थित करत, जलतरण तलावाचे कंत्राट 2024 साली संपुष्टात आले असतानाही तेच कंत्राटदार आजपर्यंत व्यवस्थापन कसे करत आहेत, असा सवाल उपस्थित केला. या गंभीर बाबीची दखल घेत आयुक्तांनी तातडीने तलाव




सील करण्याची भूमिका मांडली.

मात्र, या निर्णयाला विरोध करत नगरसेवक प्रशांत जगताप यांनी प्रशासनाला धारेवर धरले. उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये परिसरातील मोठ्या संख्येने लहान मुले या तलावात पोहण्यासाठी येतात. प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे या मुलांना त्रास होऊ नये, असे त्यांनी ठामपणे सांगितले. तसेच, संबंधित कंत्राटदाराकडून जलतरण तलावाचा ताबा घेऊन तो थेट महापालिकेच्या नियंत्रणाखाली चालवावा, अशी ठोस मागणीही त्यांनी केली. त्यांच्या या सूचनेवर सकारात्मक विचार करण्यात येईल, असे आश्वासन आयुक्तांनी दिले.दरम्यान, या प्रकरणामुळे महानगरपालिकेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, पुढील काही दिवसांत प्रशासन काय निर्णय घेते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# प्रेमसंबंधाच्या संशयातून विवाहितेची घरात घुसून हत्या

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**छत्रपती संभाजीनगर : शहरातील एका उच्चभ्रू वस्तीत सोमवारी सकाळी घडलेल्या थरारक घटनेने परिसर हादरून गेला. एका विवाहित महिलेची तिच्याच घरात धारदार शस्त्राने निर्घृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली असून, पोलिसांनी आरोपी महिलेला घटनास्थळावरून तात्काळ अटक केली आहे.**




पोलिसांच्या प्राथमिक तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, आरोपी महिलेचे मृत महिलेच्या पतीसोबत कथित प्रेमसंबंध होते. या कारणावरून काही दिवसांपूर्वी दोन्ही महिलांमध्ये जोरदार वादावादी झाल्याचे समोर आले आहे. आरोपी महिला विधवा असून, ती या संबंधांमध्ये भावनिकदृष्ट्या गुंतल्याची माहिती तपासात पुढे आली आहे.

सोमवारी सकाळी आरोपी महिलेने संतापाच्या भरात थेट पीडितेच्या घरात प्रवेश केला. त्यानंतर धारदार शस्त्राने तिने महिलेवर सपासप वार केले.

या भीषण हल्ल्यात महिलेच्या छातीवर, पोटावर तसेच शरीराच्या इतर भागांवर गंभीर जखमा झाल्या. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या महिलेचा जागीच मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच Maharashtra Police तात्काळ घटनास्थळी दाखल झाले.

पंचनामा करताना पोलिसांना घरातून परदेशी बनावटीचे एक पिस्तूलही जप्त करण्यात आले. त्यामुळे या खूनप्रकरणाला नवे वळण मिळाले आहे.

आरोपी महिलेने हे पिस्तूल कुठून आणले, त्याचा गुन्ह्यात वापर झाला होता का, तसेच हत्या पूर्वनियोजित होती की आवेशातून करण्यात आली, याचा तपास पोलीस करत आहेत.

या प्रकरणी खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शुक्रवार दिनांक 24/04/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# शहरातील अनधिकृत बांधकामांवर महानगरपालिकेची कारवाई

**दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत**

**पिंपरी : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाच्या वतीने शहरातील विविध भागांमध्ये अनधिकृत बांधकामांविरोधात व्यापक कारवाई मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेदरम्यान ड क्षेत्रीय कार्यालयांतर्गत पिंपळे गुरव येथील 530 चौ.मी. तसेच ह क्षेत्रीय कार्यालयांतर्गत नवी सांगवी परिसरातील 1 हजार 545 चौ.मी. अनधिकृत पद्धतीने उभारण्यात आलेल्या आरसीसी बांधकामांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली. तसेच इतर नियमबाह्य उभारण्यात आलेली बांधकामे देखील पाडण्यात आली.**

मागील आठवड्यात पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयनिहाय करण्यात येणाऱ्या अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांविरोधातील धडक निष्कासन कारवाईचा आढावा आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी नुकताच घेतला.

त्यानंतर शहरातील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांविरोधात कारवाई अधिक सक्त करण्याचे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले होते. त्यानुसार अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित अधिकाऱ्यांनी शहरातील विविध भागांमध्ये व्यापक कारवाई मोहीम हाती घेतली आहे.

ड क्षेत्रीय कार्यालयांतर्गत क्षेत्रीय अधिकारी पूजा दुधनाळे यांच्या नेतृत्वात वार्ड क्र. 29, पिंपळे गुरव येथील गणेशनगर,




साईनाथनगर, लक्ष्मीनगर परिसरातील एकूण 530 चौ.मी. आरसीसी बांधकामांवर निष्कासन कारवाई करण्यात आली. या कारवाईवेळी उपअभियंता शाम गर्जे, बीट निरीक्षक विक्रम चव्हाण, राहुल निकम, उमेश लोंढे, ओंकार देशमुख, पूजा राठोड तसेच 13 एमएसएफ जवान, 7 मजूर, 2 पोलीस, 2 ट्रॅक्टर ब्रेकर आणि 1 जेसीबी सहभागी होते.

ह क्षेत्रीय कार्यालयांतर्गत वार्ड क्र. 31 मधील नेताजी नगर, गांगर्डे नगर, विनायक नगर, गजानन नगर या भागात क्षेत्रीय अधिकारी पूजा दुधनाळे यांच्या नेतृत्वात एकूण 1 हजार 545 चौ.मी. आरसीसी बांधकामांवर निष्कासन कारवाई करण्यात आली.

या धडक कारवाईत उपअभियंता प्रताप मोरे, कनिष्ठ अभियंता जयवंत रोकडे, बीट निरीक्षक शाबोद्दिन बागबान, रोहन कांबळे, प्रफुल्ल भोकरे, सुरज माने तसेच 18 एमएसएफ जवान, 10 मजूर, 2 ट्रॅक्टर ब्रेकर आणि 1 जेसीबी यांच्या सहाय्याने ही कारवाई पार पडली.

महापालिकेच्या पथकाने केलेल्या तपासणीत विविध ठिकाणी विनापरवानगी आरसीसी बांधकामे, शेड तसेच इतर स्वरूपाची अनधिकृत वाढ आढळून आली.

त्यानुसार संबंधितांवर कारवाई करत सुमारे काही हजार चौरस फूट क्षेत्रफळातील बांधकामे हटविण्यात आली.

# पिंपरी चिंचवड महापालिकेकडून घरपोच मालमत्ता कर बिल वाटपाला सुरुवात

**दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत**

**पिंपरी : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाच्या वतीने आर्थिक वर्ष 2026-27 साठी मालमत्ता कर बिलांचे घरपोच वाटप महिला बचत गटांच्या माध्यमातून सुरू करण्यात आले आहे. शहरातील प्रत्येक मालमत्ताधारकापर्यंत कर बिल वेळेत पोहोचविण्याच्या उद्देशाने ही मोहीम राबविण्यात येत असून, बिल वाटपासाठी येणाऱ्या महिलांना नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन महापौर रवी लांडगे यांनी केले आहे.**



पिंपरी चिंचवड शहरात निवासी, व्यावसायिक, औद्योगिक, मिश्र तसेच मोकळ्या जागांसह सुमारे 7 लाख 44 हजार 630 नोंदणीकृत मिळकती आहेत. मालमत्ता सर्वेक्षणातून नव्याने सापडलेल्या मिळकतींची नोंदणी सुरू असून, एकूण मिळकतींची संख्या 8 लाखांपर्यंत होण्याची शक्यता आहे. या सर्व मिळकतींच्या कर देयकांचे वितरण महिला बचत गटांमार्फत घरोघरी करण्याची कामकाज महापालिकेने महिला आर्थिक विकास महामंडळ यांना दिलेले आहेआहे. गेल्या तीन वर्षांत महिलांनी ही जबाबदारी प्रभावीपणे पार पाडली आहे.

कर आकारणी व कर संकलन विभागाने यावर्षी पर्यंत सर्व देयकांचे वितरण पूर्ण करण्याचे नियोजन केले आहे. थकबाकीदारांना थकीत रक्कम भरण्याबाबत जप्तीपूर्वीची नोटीस देयकासोबत दिली जाणार असून, त्यामुळे नागरिकांना वेळेत कर भरण्याची संधी उपलब्ध होणार आहे. यासोबतच महिला बचत गटांच्या माध्यमातून घरोघरी जाऊन मोबाईल क्रमांक अद्ययावत करणे, करासंदर्भातील माहिती देणे आणि प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करणे अशी कामेही केली जाणार आहेत.

या उपक्रमातून महिला सक्षमीकरणालाही चालना मिळत आहे. समाज विकास विभाग आणि टाटा स्ट्राईव्ह यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या 'सक्षम' प्रकल्पांतर्गत महिला बचत गट फेडरेशनच्या 600 हून अधिक महिलांमार्फत ही मोहीम राबवली जात आहे. तसेच, 'सिद्धी' ॲपच्या माध्यमातून मालमत्ताधारकांना घरपोच बिल वितरणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या डिजिटल प्रणालीमुळे वितरण प्रक्रिया अधिक पारदर्शक, वेगवान आणि सुलभ झाली आहे.

# पिंपरीत साकारणार त्यागमूर्ती माता रमाईंचे भव्य स्मारक -अभिषेक बारणे

**दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत**

**पिंपरी : पिंपरी-चिंचवड शहराच्या वैभवात भर टाकणारा आणि सामाजिक कृतज्ञतेची साक्ष देणारा एक ऐतिहासिक निर्णय आज घेण्यात आला. शहराच्या मध्यवर्ती पिंपरी चौकात उभारण्यात येणाऱ्या माता रमाई स्मारकाच्या स्थापत्य कामांना महानगरपालिकेच्या स्थायी समितीने आज अधिकृत मंजुरी दिली.**

**या निर्णयामुळे नागरिकांच्या दीर्घकालीन मागणीला आता मूर्त स्वरुप मिळणार असून, लवकरच या स्मारकाच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे.**



महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत महापौर मधूकर पवळे सभागृहात ही महत्त्वाची बैठक पार पडली. स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीस महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे आणि नगरसचिव मुकेश कोळप यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

माता रमाई या केवळ एका व्यक्तीचे नाव नसून, त्या असीम त्याग, संघर्ष आणि ममतेचे प्रतीक आहेत. वंचित घटकांच्या उन्नतीसाठी त्यांनी दिलेले योगदान आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक क्रांतीत त्यांनी दिलेली साथ, हा इतिहास प्रेरणादायी आहे. हे स्मारक शहराच्या मध्यवर्ती भागात होत असल्याने ते येणाऱ्या पिढ्यांसाठी एक ऊर्जा केंद्र ठरेल.

स्थायी समितीच्या या मंजुरीमुळे आता स्मारकाच्या कामाला वेग मिळणार आहे. शहराच्या सौंदर्यात भर घालण्यासोबतच सामाजिक वारसा जपण्याच्या दृष्टीने उचललेले हे पाऊल नागरिकांसाठी अभिमानास्पद ठरले आहे.

पिंपरी-चिंचवड शहराने या निर्णयाच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकीची आपली परंपरा अधिक प्रगल्भ केल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे

# धुरंधर-२ ओटीटी प्लॅटफॉर्मवर धुरळा उडवण्यासाठी सज्ज !



**दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत**

**बॉक्स ऑफिसवर रणवीर सिंहच्या धुरंधर 2 या चित्रपटाने अक्षरशः धुरळा उडवला. आता धुरंधर 2 चं हे तुफान घराघरात पोहोचणार आहे. चित्रपटगृहांमध्ये 1700 कोटींपेक्षा जास्त कमाई करणाऱ्या या चित्रपटाचे OTT वर येण्याचे मार्ग खुले झाले आहेत. अनेक ठिकाणी हा चित्रपट अजूनही हाउसफुल आहे. अनेक चित्रपटगृहातील यशस्वी कामगिरीनंतर धुरंधर : द रिव्हेंज चित्रपट ओटीटी प्लॅटफॉर्मवर धुरळा उडवण्यासाठी सज्ज झालाय.**

गेल्या काही दिवसांपासून हा चित्रपट ओटीटीवर कधी दाखवला जाणार याबाबत तर चर्चेला उधाण आले होते. शिवाय धुरंधरचा पहिला भाग नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झालेला. पण चित्रपटाच्या निर्मात्यांनी दुसऱ्या भागाचे हक्क नेटफ्लिक्सला न विकल्याच्या चर्चा होत्या. आता धुरंधर 2 चित्रपट नेमका कुठे व कधी रिलीज होणार याबाबत महत्त्वाची अपडेट समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार 'धुरंधर द रीवेंज ' या चित्रपटाचे डिजिटल हक्क जिओ हॉटस्टारने सुमारे 150 कोटी रुपयांचा करार करत विकत घेतले आहेत.

त्यामुळे आत्तापर्यंतचा कुठल्याही हिंदी चित्रपटासाठी सर्वात फायदेशीर ओटीटी डीलमधील हा चित्रपट ठरला आहे. विशेष म्हणजे नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झालेल्या मागील भागाच्या तुलनेत निर्मात्यांनी डिजिटल रिलीजच्या पद्धतीत बदल करण्याचे संकेत आधीच दिले होते. साधारणपणे चित्रपटगृहात प्रदर्शित झाल्यानंतर दोन ते तीन महिन्यांच्या आत ते चित्रपट ओटीपी प्लॅटफॉर्मवर येतो.

पण धुरंधर 2 साठी ही वेळ काहीशी वाढलेली होती. 19 मार्च 2026 रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झालेला हा चित्रपट अजूनही बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई करतोय.

आता धुरंधर 2 जिओ हॉटस्टार वर प्रदर्शित होणार असून हॉटस्टार विलीनीकरणानंतर हा पहिला मोठा ब्लॉगबस्टर चित्रपट ठरणार आहे. व्यापार तज्ञांचे मते, हा चित्रपट ओटीटी वरील सर्वाधिक पाहिल्या जाणाऱ्या चित्रपटांपैकी एक ठरू शकतो. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर दोन हजार कोटींचा टप्पा ओलांडला तर तो अमीर खानचा दंगल चित्रपटाला मागे टाकेल. जरी निर्मात्यांनी आणि जिओ स्टुडिओने अद्याप अधिकृत घोषणा केलेली नसली तरी, हा चित्रपट 14 मे रोजी जिओ हॉटस्टार वर प्रदर्शित होऊ शकतो.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968